नि.फौ.ख.क्र. १४२/२०२४

सरकार –वि– लक्ष्मण घनमोडे + २

नि.क्र. २५

## सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव – संतोष काशीनाथ आळशी

वय. ४९ वर्षे, व्यवसाय – पेंटर,

राहणार – माटरगाव, ता. शेगाव, जिल्हा – बुलडाणा.

## सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती शहा, सरकारी वकील.

१. न्यायालयात उपस्थित व अनुपस्थितीत असलेल्या तिन्ही आरोपींना मी ओळखतो कारण की ते माझ्या गावचे आहेत. घटना अंदाजे एक वर्षापूर्वी माटरगाव येथे मोरीमायच्या मंदिराजवळ दुपारी ११.३० ते १२.०० वाजताच्या दरम्यान घडली होती. मी, माझा मुलगा व माझा मित्र जगन धारोकार असे सगळे मिळून माझ्या नातेवाईकाच्या लग्नात वरद इच्छापुर येथे लग्नाला जात होतो. घटनेच्या दोन वर्षाअगोदर लक्ष्मण घनमोडे यांच्याकडून ४०,०००/– रुपये घेवून माटरगाव येथील चांडक या व्यक्तीला दिले होते. चांडक याने ४०,०००/– रुपये रक्कमेवर १० टक्के व्याज दरमहिना दर शेकडा लक्ष्मण पांडुरंग घनमोडे यांना दिले होते. चांडक या व्यक्तीने लक्ष्मण घनमोडे यांचे पैसे न दिल्यामुळे मी माझी शेती विकून लक्ष्मण घनमोडे यांना ४०,०००/– रुपये परत केले. ४०,०००/– रुपये या रक्कमेवरील व्याज देण्यासाठी मी लक्ष्मण घनमोडे यांना दोन तीन दिवस थांबण्याची विनंती केली असता लक्ष्मण घनमोडे याने मला व माझ्या पत्नीला मोरीमायच्या मंदिराजवळ अडवून तुझी बायको कोणाच्या खाली घाल व मला व्याज आणून दे अशा अश्लील शब्दात शिवीगाळ केली. मी सुध्दा लक्ष्मण घनमोडे यांना मादरचोदा, तुझे एवढे पैसे दिले व्याज देणार नाही का अशी शिवीगाळ केली. त्यानंतर लक्ष्मण घनमोडे यांनी त्यांच्या मुलांना माहिती दिल्यामुळे तिथे त्यांचे मुले सोपान घनमोडे व निवृत्ती घनमोडे हे धावत आले. लक्ष्मण घनमोडे, सोपान घनमोडे व निवृत्ती घनमोडे यांनी मला काठीने, दगड व विटेने पाठीवर, पोटावर, छातीवर व पायावर मारले. त्यामुळे माझ्या पूर्ण शरिरावर जखमा होवून रक्त निघाले. त्यानंतर मी जलंब पोलीस स्टेशनला आलो. पोलीसांनी माझी वैद्यकीय तपासणी करण्यासाठी मला शेगाव येथील सरकारी रुग्णालयात आणले. रुग्णालयातून परत आल्यानंतर माझा तोंडी रिपोर्ट घेण्यात आला. आता मला तोंडी रिपोर्ट दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **निशाणी क्र. २६** देण्यात येतो. पोलीसांनी घटनास्थळावर येवून माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला व घटनास्थळावर असलेली काठी पोलीसांनी नेली. पोलीसांनी माझा जबाब नोंदविला होता. ज्या काठीने मला

मारहाण केली ती मला दाखविली तर मी ती ओळखु शकतो. आता मला एक काठी दाखविण्यात आली. त्या काठीने मला मारहाण करण्यात आली नव्हती. ज्या काठीने मला मारहाण करण्यात आली होती ती काठी जाड होती. तीन आरोपींनीपैकी एक आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

<u>**सरतपास संपला.**</u>

<u>**उलटतपास आरोपींतर्फे श्री. एस. जी. वानखडे, वकील यांचे मार्फत.**</u>

२. हे म्हणणे खरे आहे की, माटरगाव शेगाव तालुक्यातील सर्वात मोठे गाव आहे. हे म्हणणे खरे आहे की, माटरगाव येथे बऱ्याच जाती धर्माचे लोक राहतात. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाजवळ आरोपी क्र. १ ची छोटीशी पानटपरी आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या पूर्वी माझे आरोपींसोबत चांगले संबंध होते.

प्रश्न – ज्या ज्या वेळेस तुम्हाला वेळ मिळत होता त्या त्या वेळेस तुम्ही आरोपी क्र. १ च्या पानटपरीवर जात होते ?

उत्तर – मी तीन महिन्यातून एकदा आरोपी क्र. १ च्या पानटपरीवर व्याजाचे पैसे देण्यासाठी जात होतो.

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ चा मुलगा निवृत्ती याचे लग्न झालेले नाही. आरोपीकडे दिड एकर शेती आहे की काय हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा भाऊ गणेश याचे शेत व माझे शेत जवळजवळ आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ माझ्याा गावचे असल्यामुळे त्याच्याशी मी ओळख निर्माण करुन त्याचा मुलगा निवृत्ती याच्यासाठी मी मुलगी शोधतो असे बरेचदा मी आरोपी क्र. १ ला सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ च्या मुलासाठी मी मुली शोधतो असे आरोपींना आश्वासन देवून मी आरोपी क्र. १ कडून ८०,०००/– रुपये, आरोपी क्र. २ कडून ४०,०००/– रुपये व आरोपी क्र. १ चा भाऊ गणेश घनमोडे यांच्याकडून २०,०००/– रुपये उकळले होते.

४. मी, माझा मुलगा व माझा मित्र जगन झाडोकार मोटारसायकलने लग्नाला जात होतो. मला मोटारसायकलचा नोंदणीकृत क्रमांक सांगता येणार नाही. दुचाकी गाडीवर फक्त दोनच व्यक्ती प्रवास करु शकतात याबाबत मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही मोटारसायकलवर घटनेच्या दिवशी तीन व्यक्ती जात होतो. मी लक्ष्मण घनमोडे याचे पैसे देण्याकरीता माझी स्वतःची शेती विकली व लक्ष्मण घनमोडे यांच्याकडून घेतलेले पैसे दिले ही बाब मी पोलीसांना जबाब देतांना सांगितली होती. आरोपींनी मला अश्लील शिवीगाळ केली ही बाब मी पोलीसांना जबाबामध्ये सांगितली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी जे पोलीसांना सांगितले ते पोलीसांनी लिहिले नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, मी पोलीसांना अश्लील शिवीगाळ लिहू नका असे सांगितले होते. माटरगाव पासून जलंब अंदाजे

४ किलोमीटर अंतरावर आहे. पायी जलंबला जायचे असेल तर अर्धा तास लागतो व मोटारसायकलने जायचे असल्यास १० मिनिटे लागतात. मी पोलीस स्टेशनला दिड दोन वाजता रिपोर्ट देण्यासाठी गेलो होतो. मी पोलीस स्टेशनला अर्धा तास थांबलो. साक्षीदार आता सांगतो की, मी पोलीस स्टेशनमध्ये १० मिनीटे थांबलो व पोलीसांनी मला दवाखान्यात नेले. दवाखान्यात मी किती वेळ थांबलो हे मी निश्चितपणे सांगु शकत नाही. मी पोलीसांसोबत दवाखान्यात गेलो होतो. माझी वैद्यकीय तपासणी झाल्यानंतर मी पोलीस स्टेशनला परत आलो व रिपोर्ट देईपर्यंत मी पोलीस स्टेशनला थांबलो. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिल्यानंतर माझा पोलीसांशी या घटनेसंदर्भाने संबंध आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींचे माझ्यावर असलेले १,४०,०००/- घटनेच्या दिवशी आरोपींनी मागितले असता मिच आरोपींना मारहाण केली होती. या घटनेनंतर आरोपींनी माझ्या विरोधात तक्रार केली की काय हे मला माहिती नाही. मी आरोपींना मारहाण केल्यामुळे आरोपींनी डॉ.बढे यांच्याकडे उपचार घेतला आहे की काय हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला पैसे मागु नये म्हणून मी त्यांच्यावर खोटी केस केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला संपूर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या अगोदर मी माझी शेती विकली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझी शेती विकून मी आरोपींचे पैसे दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटना घडल्यानंतर आजपासून पाच सहा महिन्यापूर्वी मी माझी शेती विकली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास संपला.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/- | स्वा/- |
| (एन. डी. मेश्राम) | (एन. डी. मेश्राम) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.१२.०३.२०२५ | दि.१२.०३.२०२५ |